# चित्र रसास्वाद



साहित्य प्रतिष्ठान

संदीप मधुकर देवल

पुस्तकाचे नाव : चित्र रसास्वाद

प्रकार : कला समिक्षा

लेखक : संदीप मधुकर देवल
ठाणे

9821400481
sandeepdewal@yahoo.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com

e Sahity Pratishthan
eleventh floor
eternity : G1102
eastern express highway
Thane (400604)


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करूशकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वपर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे .
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रूपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .

# मनोगत

चित्रसंवाद ह्या माझ्या ग्रंथाली प्रकाशनाव्दारे दिनांक २० जून २००९ रोजी प्रकाशित झालेल्या पहिल्या पुस्तकात चित्रकलेचा रसास्वाद घेण्यास अभ्यासकाच्या दृष्टिने उपयुक्त अशा मानसिक तथा भावनिक, आध्यात्मीक, तांत्रीक (Technical), इ. दृष्य जाणिवांवर परिणामकारक तसेच चित्रशैली व कालेतील तंत्रात्मक बदल अथवा प्रगती इ. ऐतीहासीक घटनांचा आढावा घेतला.




ह्या पुस्तकाबद्दल थोडक्यात सांगयचे झाल्यास "चित्रकलेचा आस्वाद घेण्यासाठी चित्रकलेची माध्यमे, तंत्र, कलेचा इतिहास, आणि कलेची मूलतत्त्वे यांची तोंड ओळख हावी. शाळेत चित्रकला हा विषय तांत्रिक दृष्टिकोनातूनच शिकवला जातो. शाळेतून कवितेचा रसास्वाद शिकवला जातो, तसा चित्रांचा, चित्रकलेचा, पेंटिंगचा रसास्वाद शिकता येइल का? ह्या विचाराने चित्रकला, पेंटिंग ह्या विषयावर एका आस्वादकाच्या दृष्टिकोनातुन माहिती देण्याच्या उद्देशाने हे पुस्तका लिहिले आहे."

ह्या पुस्तकाच्या वाचकांपैकी अनेकांनी, चित्रकलेतील व कलेसंदर्भात वापरल्या जाणाऱ्या इंग्रजी संज्ञांचे मराठीकरण केलेले आहेका किंवा अशा इंग्रजी मराठी संज्ञांची एखादी जंत्री - शब्दसूची उपलब्ध आहेका अथवा देता येईल का ह्याबद्दल चौकशी केली.

चित्रसंवाद पुस्तकाच्या वाचकांना कलेतील व कलेसंदर्भात (कला समीक्षा करण्यास वापरल्या जाणाऱ्या) इंग्रजी संज्ञांची मराठी सुची उपलब्ध झाल्यास ह्या कलेच्या आस्वादाकांचे काला समिक्षणासाठी उपयुक्त अशी शब्दसंपदा तयार होण्यास मदत होइल, तसेच चित्रसंवाद न वाचलेल्या वाचकांना देखील कलेतील उपयुक्त परिणाम कारक घटक ज्यांना कलेतील मुलतत्त्वे म्हणता येइल ह्यांची थोडी माहीती ह्या कलेतील संज्ञासूची बरोबर दिल्यास सर्वसामान्य कलाप्रेमींना कलेची आपापल्या आवडी निवडी नुसार समिक्षणात्मक चिकित्सा व आस्वाद घेतायेण्यास मदत होईल ह्या विचाराने ही छोटीशी पुस्तिका अथवा शब्दसूची तयार करण्याचा (संकलीत करण्याचा) प्रयत्न केला आहे.

जेव्हा आपण चित्रकलेचा इतीहास, स्थित्यंतरे व शैली, तांत्रीक बदल व प्रगती ह्या बद्दल बोलतो तेव्हा प्रामुख्याने युरोपिअन कला इतिहास व तंत्र प्रगतीचा विचार होतो. कलेतील ह्या संज्ञांपैकी आपल्याला सुरवात करण्याच्या दृष्टिने व थोडी प्रगत कलासमिक्षणात्मक शब्दसूची (list of descriptive words to critique art), इंग्रजीत ज्याप्रकारे उपलब्ध आहे त्यातील निवडक आर्ट टर्मिनोलॉजी इंग्रजी मुळाक्षरानुसार ए टु झेड (Alphabetically, A to Z order) ह्या स्वरूपातच येथे देत आहे. मूळ इंग्रजी शब्द त्याला मराठी प्रतिशब्द किंवा स्पष्टीकरण / व्याख्या असे ह्या शब्दसूचीचे स्वरूप करण्याचा प्रयत्न केला आहे.

संदीप मधुकर देवल.
आर्किटेक्ट व इंटिरिअर डिझायनर
sandeepdewal@yahoo.com

## प्रकाशकांचे शब्द

चित्रकलेचं एक स्वतःचं असं भव्य जग आहे.

शाळेमध्ये आपल्याला कविता आणि साहित्याचा रसास्वाद शिकवला जातो. पण चित्राचा आस्वाद कसा घ्यावा ते मात्र आपण कुठे शिकत नाही. बरे चित्र, चांगले चित्र, श्रेष्ठ चित्र यांत कसा फ़रक करावा ते आपण समजू शकत नाही. एकाद्या चित्र प्रदर्शना मध्ये गेल्यावर आपल्याला त्या त्या चित्रांत काय बघायचे ते अनेकदा कळतच नाही. विशेषतः सर्वसामान्यांना अगदी हुबेहूब काढलेली चित्रं आवडतात. पण इंप्रेशनिस्ट, ऍबस्ट्रॅक्ट, रिऍलिस्टिक, सर-रिऍलिस्टिक, मॉडर्न, पोस्ट मॉडर्न आदि प्रकारांतली चित्रं बघून अनेकदा बुचकळयात पडल्यासारखं होतं. चारकोल पासून ते वेगवेगळे तैलरंग, ऍक्रिलिक, वॉटरकलर अशी विविध माध्यमं. चित्रकारांची विविध "घराणी", शैली, स्टाईल, ब्रशच्या फ़टकाऱ्यांचा जोर, पोत, असं चित्रकलेचं एक स्वतःचं भव्य जग आहे. संगीताइतकंच मोठं. पण सर्वसामान्यांचा त्या जगाशी फ़ारसा संबंध येत नाही. मुद्दाम म्हणून आर्ट गॅलरीत जाणारे फ़ारच कमी. त्यातून तिथे गेल्यावर नक्की काय करायचं हे माहित असणारे अधिकच कमी. त्यामुळे चित्रकलेच्या आस्वादकांचं एक उच्चभ्रू मर्यादित जग झालंय.

महाराष्ट्राचं भाग्य हे की जागतिक किर्तीचे अनेक चित्रकार महाराष्ट्राने दिले. गायतोंडे, दलाल, आदिंची चित्रं जगाच्या बाजारात शेकडो कोटींची किंमत घेऊन जातात. गायतोंडेंचं एक एक चित्र शंभर शंभर कोटींना जातं. आताच्या पिढीतही सुधीर पटवर्धनांसारखे अनेक मराठी चित्रकार गाजत आहेत. जागतिक स्तरावरच्या एका संस्थेने भारतातील सर्वोच्च दर्जाचे पाच चित्रकार निवडले. त्यात अमृता शेरगिल सोडुन इतर चारही जण ( व्हि एस गायतोंडे, रवी परांजपे, एन एस बेंद्रे, विष्णू चिंचाळकर) महाराष्ट्रीय आहेत. हे वाचलं की प्रचंड अभिमान वाटतो . पण महाराष्ट्राचं दुर्भाग्य हे की इथे तो डोळस रसिक समाज मात्र नाही. अनेकांना तर ही नांवं ऐकूनही माहित नसतील. अगदी रस्त्याने जाताना वाटेत आर्ट गॅलरी लागली तरी त्यात फ़ुकट असूनसुद्धा डोकावणं नाही. स्वतःच्या घरात दहा वीस लाखांची इंटेरिअर करणारे सधन मराठीही एखादं दोन चार लाखाचं पेंटिंग लावतील अशी शक्यता नाही. आपल्या मुलांना चित्रकार बनवण्याचं स्वप्न नाही. चित्रकारांबद्दल आदर नाही. तरुण चित्रकारांच्या मेहनतीला मोल नाही. अतिशय, अतिशयच दारूण परिस्थिती आहे, महाराष्ट्रात चित्रकलेची.

ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े चित्र रसास्वाद नावाची एक मालिका सुरू करत आहोत. या सिरीज मधून अनेक जाणकार लिहीतील. यातले पहिले पुष्प, चित्रकार आणि चित्रकलेबद्दलचे प्रसिद्ध लेखक श्री संदिप देवल यांच्या पुस्तिकेने ओवीत आहोत. आशा आहे, मराठी रसिकांकडून या उपक्रमाला जोरदार प्रतिसाद मिळेल.

टीम ई साहित्य

# चित्रकला रसास्वाद

आपल्या कलेच्या आस्वादासाठी येथे प्रामुख्याने चित्रकला, पेंटिंगचाच विचार आपण करणार आहोत. कला समीक्षण अथवा परीक्षण हा शब्द वापरला म्हणजे आपण इतरांना प्रभावित करणारे किंवा कोठे छापून आणण्यास कलाकृतींचे खूप बौद्धीक अथवा वैचारीक विश्लेषण आपण करायचे आहे असा कृपया समज करून घेऊ नये. आपल्या दृष्टिने कला समिक्षण म्हणजे आपल्या आवडीनिवडींचे आपल्यासमोरील कलाकृतीतून व्यक्त होऊ शकणाऱ्या भाव भावनांशी जुळणारे नाते व त्यातून निर्माण होणारे आपले वैयक्तिक निवडीचे तत्व समजून घेणे व त्याबद्दल स्वतःचे मत तयार करणे.

आपण पाहिलेल्या कलाकृतीची समीक्षा करण्यास व आपल्याला त्यातील काय जाणवले व कळले हे ठरवण्यास व तसे इतरांना सांगण्यास कलेच्या इतिहासाचे ज्ञान असणे उपयुक्त ठरतेच परंतु त्याशिवाय कलेचा आस्वाद घेणे व आपल्या पुरती समीक्षा व टीका करणे अशक्यच आहे असे मात्र काही नाही. कलेच्या इतिहासाचे ज्ञान हे आपली त्या विषयावरील हुकमत व अधिकार सिद्ध करायला मदत करेल. मात्र निव्वळ आस्वादकाच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास, समीक्षा म्हणजे कोणताही पूर्वग्रह व तुलनात्मक टीकेविरहीत आपल्या समोरील कलाकृती पाहून आपल्या मनात निर्माण झालेल्या भावनिक प्रतिसादात्मक संवेदना, त्या ओळखणे व शब्दात व्यक्त करणे.

कलाकृती पहाणे, समजून घेणे व त्यावर भाष्य करणे म्हणजे कलाकृतींतून व्यक्त होणाऱ्या कलाकाराच्या भावनांना दिलेला प्रतिसाद. त्यासाठी कलाकृती, पेंटिंग नेहमीच सुंदर असायला व दिसायला हव्यात व कलाकृतींमधून कलाकाराने सौंदर्यच दाखवावे अशी अपेक्षा करणे म्हणजे सर्व लोकांनी नेहमीच आनंदी असावे व रहावे अशी आपेक्षा करण्यासारखे आहे. म्हणूनच मग एखादी इतरांना न आवडलेली कलकृती आपल्याला आवडली किंवा एखाद्या खूप नावाजलेल्या कलाकाराची अथवा वाखाणलेली कलाकृती आपल्याला आवडली नाही तरी त्यामागचे कारण आपल्याला समजू शकते व आपल्यावर इतरांची मते लादली जाण्याची शक्यता कमी होते. त्यासाठी कलेसंदर्भात वापरल्याजाणाऱ्या विश्लेषणात्मक संज्ञा आपल्याला माहीत असाव्या लागतील.

कलाकृतींतून व्यक्त होणाऱ्या कलाकाराच्या भावनांना समजून घेण्यासाठी आपल्यासमोरील कलाकृतीचे विश्लेषण अथवा समीक्षा करण्यास त्यातील सर्व परिणाम कारक पैलूंचा एक एक करून पायरी

पायरीने विचार करून  त्यांचा आपल्या जाणिवेवर होणारा एकत्रीत परिणाम ओळखावा लागतो. त्यासाठी सर्वसाधारणपणे

☆ हे चित्र पेटिंग कोणत्या प्रकारात मोडते?

१. व्यक्तीचित्रण (Portrait)
२. निसर्गचित्रण (Landscape)
३. स्थिरचित्रण (Still life)
४. अलंकारिक, भौमितिक आकृतीप्रधान, मांडणीप्रधान (Decorative / Compositional)
५. अमूर्त चित्रण विरूपीकरण (Abstrace)

☆ **माध्यम** ः ह्या कलाकृतीच्या निर्मितीसाठी कोणते माध्यम (Medium) वापरले आहे?

१. तैल रंग (Oil painting)
२. एक्रॅलीक (Acrylic)
३. जलरंग (Watercolor)
४. पेन्सिल (Color or Graphite pencil)
५. कोळसा (Charcoal)
६. तैलरंग खडू (Oil pastels)
७. मिश्र माध्यम (Mix media)

☆ ह्या माध्यमात हि कलाकृती साकारण्यासाठी आधार म्हणून (base) कापड (Canvas, Linen, Silk), कागद (type of paper for Water, Oil or Acrylic medium) लाकूड (Type of wooden plank, plywood etc. surface used) इ. पैकी कोणत्या पृष्ठभागाचा वापर करण्यात आला आहे?

ह्या कलानिर्मिती साठी वापरलेल्या माध्यम व पृष्ठभाग यांच्या निवडीवर तंत्र व त्यानुसार साधला जाणारा दृष्य परिणाम बरेचवेळा अवलंबून असतो.

पेंटिंग व चित्रकलेच्या आस्वादा साठी प्रथम आपण कलादालनात अथवा कलासंग्रहालयात जाऊन चित्रे अथवा पेंटिंग पहाण्याची सवय लाऊन घेतली पाहिजे. आज संगणक माहीतीचे महाजाल (इंटरनेट), व पुस्तके, मासीके इ. मधून आपल्यावर जणू चित्रे, पेंटिंग ह्यांचा मारा होत असला व पहाण्यास सहज

उपलब्ध असली तरी त्यात प्रत्यक्ष चित्र, पेंटिंग मधे वापरण्यात आलेला पोत व परिणामकारकतेसाठी उपयुक्त असलेले आकारमान (Size of painting) इ. घटकांच्या आभावामुळे प्रत्यक्ष चित्रे, पेंटिंग बघणे ही एक वेगळीच अनुभूती असते. निदान ह्या बाबतीत तरी प्रत्यक्षाहूनही प्रतिमा सुंदर ही उपमा फोल ठरते, मात्र प्रत्यक्ष चित्र, पेंटिंग व निर्मितीस संदर्भ म्हणून जे वापरले असेल त्याच्या तुलनेत ही उपमा खरी ठरू शकते.

आपण कलादालनात अथवा संग्रहालयात पेंटिंग बघतो त्यावेळी दुरून प्रथम आपल्याला जाणवतो तो रंगसंगती व आकारमानांचा परिणाम. जसजसे आपण जवळून कलाकृती पाहूलागतो त्यावेळी त्यातील इतर परिणामकारक तत्वे आपल्या लक्षात येऊलागतात.

ह्या परिणामकारक तत्वांच्या ज्यांना कलेतील मुलतत्वे म्हणून संबोधले जाते त्यांच्या तुलनात्मक नातेसंबधावर पेंटिंगची परिणामकारकता अवलंबून असते व हे सजून घेण्यास आपल्याला पेंटिंग मधील, रेषा - (Line) . आकार - (Shapes and Forms) . रंग (Color) . विरोधाभास (Contrast) . प्रमाण बद्धता (Proportion and Scale) . पोत (Texture) . दृष्यभास / परिणाम कारकता, छटा (Tone) (हा शब्द मराठीत वापरताना आपण नेहमी रंगछटा ह्या संदर्भात वापरतो तसाच पोतबदल व इतर तत्वांमधील सूक्ष्म बदल व केलेला फरक इ. संदर्भात ही पहावा) . दृष्यगती (Movement) . शैली (Style). इत्यादी पैलूंचा विचार व अभ्यास करावा लागतो. हे सर्व आतापर्यंत उल्लेखलेले पैलू हे चित्र पेंटिंगच्या तांत्रिक अंगाशी निगडीत आहेत. ह्या प्रमुख तत्वांची उपतत्वे, तत्वांच्या अनुषंगाने येणाऱ्या, व ह्या पैलूंच्या परस्परांतील नातेसंबंधाने निर्माण होणाऱ्या इतर सर्व पैलूंचे सचित्र विश्लेषण वर उल्लेख केलेल्या माझ्या चित्रसंवाद ह्या पुस्तकात दिलेआहे. उदा. रेषेबद्दल गतिशीलता, नजाकत, जाडी व त्यातून निर्माण होणारे भाव म्हणजे आक्रमकता व साधेपणा इ. पैलू व्यक्त होतात. छटा म्हणजे टोन मधून विरोधाभास, नाटयमयता, तरलपणा इ.पैलू व्यक्त होतात. पोत हे पृष्ठभागाचा खडबडीत पणा अथवा मुलायमता दर्श वून सहजपणा अथवा असमानता, अव्यवस्था, गोंधळ इ. दर्शवतात. प्रमाणबद्धतेतून महत्व अथवा कनिष्ठ, दुय्यम दर्जा इ. व्यक्त होण्यास प्रयत्न पुर्वक केलेले बदल. हे सर्व पैलू पेंटिंगज् ची समिक्षा, टिका करताना विचारात घेतले जातात.

कलेच्या आस्वादासाठी ह्या तांत्रिक पैलूंबरोबरच सांस्कृतिक, भावनिक, सामाजिक, ऐतिहासीक, इ. संदर्भ, म्हणूनच तात्विक चिंतन (Philosophy) व अध्यात्म ज्याला इंग्रजी मधे स्पिरिच्युआलिटी इन आर्ट असे म्हटले जाते ते पैलू देखिल विचारात घ्यावे लागतात. व ह्या सर्वांचा परिपाक म्हणून पेंटिंग मधून व्यक्त होणारी नरेटिव क्वालिटी म्हणजेच चित्राची पेंटिंगची कथासांगण्याची, दर्शकाशी संवाद साधण्याची क्षमताा ह्याचे यथायोग्य स्पष्टीकरण चित्रसंवाद ह्या पुस्तकात दिलेले आहे.

ह्या वर उल्लेखलेल्या तत्वांपैकी कला शैली हे एकच तत्व स्थळ, काळ व व्यक्तिसापेक्ष आहे म्हणजेच ऐतिहासीक घटनांशी निगडित व अवलंबून आहे.

कला समिक्षा अथवा कलेबद्दल कोणत्याही चर्चेमधे हमखास उद्‌भवणारा मुद्दा म्हणजे पेटिंगस्‌ची किंमत व चित्रांना, पेंटिंगस्‌ना इतकी किंमत का असते? हा प्रश्ण खरेतर पेटिंगच्या आस्वादासाठी व कला समिक्षेसाठी (आपल्या आवडीनिवडींचे केलेले विश्लेषण) हा मुद्दा अगदी गौण ठरतो व इथे हा मुद्दा उपस्थित करावा ही माझी इच्छा ही नव्हती. तरीही असे लक्षात येते कि सर्वसाधारणपणे ह्या एकाच मुद्यावर चर्चा येऊन थांबते व खरेतर कला ही नेहमीच अमूल्यच असते, इ. थातुर मातुर स्पष्टीकरणे देऊन व आपले समाधान झाले आहे हे भासवून वेळ निभाऊन नेली जाते. तरी एकंदरीत कलेचे मोल करता येत नाही, ती अमूल्य असते, म्हणजे तिला मोल नसते व कलाकाराने ती फुकट दिली पाहिजे, फार फार तर खूश होऊन देऊ काहीतरी आम्ही, असा काहिसा समज असल्यासारखे भाव लोकांच्या बोलण्यातून व्यक्त होताना दिसतात.

काही महिन्यांपूर्वी मी एका समारंभाला गेलो होतो तिथे साधारण ३५ ते ४५ वयोगटातील (बऱ्यापैकी सुखवस्तु व उच्चभ्रू) काही जण, नुकत्याच होऊन गेलेल्या पहिल्या ठाणे उपवन आर्ट फेस्टिवल बद्दल चर्चा करत होते त्या पैकी एक कोठल्या तरी बॅंक अथवा तत्सम वाणिज्य आस्थापनेत बऱ्यापैकी हुद्यावर असलेली व्यक्ती अगदी आश्चर्याने व अचंबित होऊन सांगत होती की त्या आर्टफेस्टिवल मधे एक चित्र, एक पेंटिंग रू. ६५000 पासष्ट हजारांना विकले गेले. कोणीतरी एक चित्र निव्वळ एक पेंटिंग ६५000 रू. ला विकत घेतले त्याचे ह्या माणसाला इतके अप्रुप व आश्चर्य वाटत होते कि असे कसे व कोण इतके पैसे पेंटिंग विकत घेण्यासाठी उधळतात. जणू ह्या माणसाची आयुष्यभराची कमाई व बचत कोणीतरी उधळली अशा पोटतिडकिने तो त्याचे आश्चर्य व्यक्त करत होता. त्याच्या बोलण्यातून त्या कलाकृतीबद्दल इतर काहीच माहिती मिळत नव्हती.

एक चिनी म्हण आहे "आपल्याकडे काही पैसे असतील तर त्यातल्या थोडया पैशांतून तांदूळ विकत घ्यावे व थोडया पैशांतून एखादे फूल विकत घ्यावे कारण तांदूळ आपल्याला जगायला मदत करेल तर फूल आपल्याला जगायला शिकवेल.

असो, तरीही कलाकृतींच्या किमतींबद्दल सर्वत्र, जवळपास अगदी जगभर "त्या अमूल्य असतात, म्हणजे त्यांना मूल्य नसते, कलाकाराने ती फुकट दिली पाहिजे फारफार तर आम्ही खूश होऊन देऊ काहीतरी" असाच काहीसा समज असल्यासारखे चित्र आपण ह्या विषयाबद्दल इंटरनेटवर शोधल्यासही दिसून येते व त्यावर कलाकारालाही कौटुंबिक खर्च असतातच तो ही माणुसच आहे त्यालाही लाईट बिल, जागेचे भाडे द्यावे लागते, इ. इ. बरीच मते मतांतरे तिथे सापडतात.

कलानिर्मीतीतील सृजनत्वाचा व प्रतीभेचा भाग हा त्या कला निर्मीतीच्या पूर्णत्वाच्या क्षणापर्यन्त असतो नंतर जर कलाकाराला ती कलाकृती कोणाला विकायची असेल तर उरतो तो व्यवहार आणि व्यापार. कलेमधे म्हणजे कलानिर्मीतीला व्यापारी व बाजारूपणा चे स्वरूप असूनये हे ठीक पण निर्मीलेल्या कलाकृतींचा व्यापार का करू नये व त्यापासून फायदा का मिळवू नये हे अनाकलनीय आहे.

व्यापार म्हटला की मग सर्व परिणामकारक गोष्टिंचा विचार करावा लागतो उ. कच्च्यामालाची किंमत, त्याच्या निर्मितीसाठी खर्च झालेले मनुष्यबळ (Labour) कच्च्या व तयार मालाच्या साठवणूक व देखभाल करण्यास लागणारी जागा व त्या अनुषंगाने येणारे इतर खर्च, लोकांपर्यन्त ती वस्तू पोहचवण्यास व प्रसिध्दीसाठी लागणारी मेहनत व खर्च त्यातून मिळू शकणारा नफा, रिस्क फॅक्टर इ. इ. सर्व आले. सर्व साधारणपणे कोणतीही व्यापारी आस्थापना अथवा सल्लागार संस्था संचालक त्यांच्या सर्व खर्चावर, म्हणजे नोकरांना दिलेले पगार, इतर फायदे, त्यांच्यावर केलेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च म्हणजे साहित्य वातानुकुलन इ. सोई सुविधा पुरवणे जाहीरात प्रसिद्धी, कमिशन वगैरे इतर सर्व खर्च जमेस धरून त्यावर साधारण किमान ५ पट तरी परतावा मिळावा ही अपेक्षा ठेऊनच सर्व उठाठेव करतात (रिच डॅड पुअर डॅड च्या लेखकानुसार साधारण १0 पट परतावा मिळावा हे उद्दिष्ट ठेऊन व्यवसाय करावा). नाहीतर त्यापेक्षा नोकरी केलेली बरी त्यात धोका (Risk factor) नसतो असेच हे व्यापारी अथवा सल्लगार, संचालक म्हणताना दिसतील. नोकरदार वर्ग हा नेहमीच आपल्याला किती कमी पगार मिळतो व त्यामानाने काम किती असते व आपल्या जिवावरच संचालक कसा प्रचंड नफा कमवत असतात हे गाणे गाताना दिसतील.

आता एखाद्या कलाकाराने आपली कलाकृती किती किमतीला विकावी व कोणी ती किती किमतीला घ्यावी हा ज्याचा त्याचा वैयक्तीक प्रश्ण असला व पेटिंग विकत घेण्याची मानसीकता असलेला देखिल असा प्रकारे कच्चा माल अधिक मनुष्यबळ हा हिशोब घालत न बसता त्या कलाकृतीचे कलामूल्य जोखून ती कलाकृती विकत घेत असला, तरी समजा हा व्यापाराचा दृष्टिकोन जर कलाकृतींच्या व्यापाराला लावला (इथे मुद्दामहून मी कलाकृती अमूल्य असतात म्हणून मौल्यवान वस्तू, सोने, हिरे, माणके, यांची उपमा देत नाही व तुलना देखील करत नाही) तर निव्वळ व्यापाराच्या तत्वाने कलाकृतीची एखाद्या पेंटिंगची किंमत ठरवता येऊ शकते का ही शक्यता आपण पडताळून पाहूयात.

अर्थातच हा हिशोब एखाद्या मुद्दामहून एखाद्याच्या अनुज्ञेप्रमाणे, गरजेप्रमाणे तयार करून दिलेल्या ज्याला इंग्रजीत कमिशन्ड पेटिंग (Commissioned painting) म्हणतात त्याला लावता येणार नाही तरी उदाहरणादाखल असे म्हणूयात की समजा एक दोन फूट लांबी रूंदी चे म्हणजे चार स्क्वेअर फुटाचे एक पेंटिंग तयार करायला अंदाजे

१. कच्चा माल म्हणजे स्ट्रेच्डकॅनव्हस, रंग (अर्थातच इथे प्रामुख्याने ॲक्रॅलिक पेंटिंग चा विचार केला आहे. ऑइल पेंटिंगचे वापरलेले तंत्र व त्यानुसार लागणारा कालावधी व ॲक्रॅलिक पेंटिंग ह्यामधे फार फरक असूशकतो.) ह्याचा खर्च साधारण पणे ८00 ते १२00 रू पर्यन्त होतो. (ह्यात ब्रशचा व बाह्य फ्रेमचा खर्च नाही)

२. मनुष्यबळ (Labour cost) जर का आपण कलाकाराला एखाद्या प्रोफेशनल ग्रॅज्युएट (जो तो असतोच) चा दर्जा दिला व कोणत्याही वाणिज्य किंवा तत्सम आस्थापनांमधील पगाराची तासवार विभागणि केली किंवा शैक्षणिक संस्थांमधिल व्हिजिटिंग फॅकल्टीचे ताशी ३00 रू हा हिशोब गृहीत धरला व हे पेंटिंग करायला जर का कलाकाराला दीड ते दोन दिवस किंवा १५ ते २0 तास लागले (हे कामाचे तास त्यातील डिटेलिंगवर असलंबून असतील व कमी किंवा जास्त ही लागतील) तर मनुष्यबळ किंमत (Labour cost) झाली रू. ४५00 ते ६000 रू. (ह्यात विषय निवडिसाठी केलेला आभ्यास मनन चिंतन इ. साठी खर्च केलेल्या वेळेचा विचार केलेला नाही)

३. समजा ४५00 रू. अधीक साधारण १000 रू. कच्चामाल, तर तयार पेंटिंगची किंमत झाली रू. ५५00 ज्यात जागा भाडे, साठवणूक, विजबिल, लोकांर्पंत पोहचण्यास येणारा प्रमोशन, प्रदर्शन खर्च फ्रेम खर्च इ. काही नाही.

४. कलाकाराला ह्यासाठी काही दरमहा पगार कोणी देत नाही व कलाकृती तयार झाल्याझाल्या कोणी विकत घ्यायला येत नाही. तेव्हा रिस्क फॅक्टरचे ५ ते १0 पट गणीत जे सर्वच व्यापारी अस्थापना वापरतात ते वापरले तर ह्या दोन फूट लांबी रूंदीच्या कलाकृतीची किंमत रू. २७५00 ते ५५000 होते. असे असले तरी कलाकार त्याच्या गरजेप्रमाणे व परिस्थितीनुसार (Market trends) साधारण रू. २0000 ते रू. २५000 पासुन पुढे त्याच्या कुवतीनुसार, त्याने मिळवलेली प्रसिद्धी, त्याच्या नावाचे वलय, कलाक्षेत्रातील त्याची पत, व त्या कलाकृती ची योग्यताा ह्यावर कलाकृतीची किंमत ठरवत असतो (त्यात कलाविक्री साठी एखाादा मध्यस्त Art Curator / Connoisseur असेल तर त्याचा मोबदला).


अर्थातच अशा ठोकळेबाज गणितात कलाकृती निर्मितीचे व विक्रिचे गणित बसवता येत नाही (आणि असा प्रकारे कलाकृतींची व कलाकाराची योग्यता व पत ठरवण्यास कोणतेही मापदंड नााहीत. हे ज्याच्या त्याच्या वैयक्तीक समजुतीवरच Understanding about Art निर्धारित असते) तरिही साधारण कल्पना येण्यास पूरक ठरेल.

इथे कच्चा माल व मनुष्यबळ ही सांगड घालून किमतीचे स्पष्टिकरण देण्याचे कारण म्हणजे एकदा माझ्याकडे एक नात्यातील स्त्री तिच्या माहेरच्या कोणाच्यातरी लग्नाचे आमंत्रण देण्यास आली होती.

माझ्याकडची मी केलेली पेंटिंग पाहुन उद्‌गारली "तुम्ही पेंटिंग कारता! किती छान! कोणाला लग्नात भेट म्हणूनही देता येतील ना!" (तिच्या मते मी केलेली पेंटिंग छान आहेत का लग्नात भेट देता येऊ शकतील हे छान आहे ते अजूनही मला कळलेले नाही) आता जर वर उल्लेखलेला खर्च आपण लक्षात घेतला व निव्वळ निर्मिती खर्च म्हणजे कच्चा माल व मनुष्यबळ विचारात घेतले तर आपण कोठल्या नातेवाईकाच्या लग्नात किती किंमतीची भेट देतो व अशा भेट दिलेल्या पेंटिंगची किंमत कोणाला किती कळते व असते हा एक संशोधनाचा मुद्दा आहे. जेव्हा मी छंद व आवड म्हणून केलेल्या व घरात लावलेल्या एका तीस इंच x तीस इंच ऑइल पेंटिंग ची मूळकिंमत म्हणजे निव्वळ कॅनव्हास, व रंग धरून रू. १२00 ते रू. १५00 पर्यंत आहे व त्यासाठी महागडे ब्रश देखिल लागतात हे कळले की "ओह! म्हणजे छंद म्हणून जोपासायला खर्चिकच आहे" अशी प्रतिक्रिया ऐकायला मिळते. क्वचित प्रसंगी ती जाणकारांची व संवेदनशीलतेची कौतुकाची थाप असते, परंतू बहुतेक वेळा माझी खात्री आहे की असे उद्‌गार काढणाऱ्यांना मूळ किंमत म्हणजे कच्चामाल अधीक मनुष्यबळ (Labour hours) अशी एखाद्या अशाप्रकारच्या पेंटिंगची किंमत आठ ते दहा हजार जरी सांगीतली तरी त्यांची प्रतिक्रिया देखिल त्या समारंभातल्या माणसासारखीच असेल (अर्थात आपल्याकडे छंद म्हणून केलेल्या कृतीच्या वेळेची किंमत कोणालाच नसते, तुमचा वेळ जात नव्हता म्हणून केलेत ना हे देखील विचारतील).

हे सर्व इथे लिहीण्यास कारण म्हणजे जर का आपल्याला पेंटिंगचा आस्वाद घेण्यात, कलेचा रसास्वाद शिकण्यात स्वारस्य असेल व पेंटिंग पाहून आपल्याल आनंद मिळत असेल व आपण जर कला दालनात अथवा कोणाकडे पेंटिंग पाहिली तर आपण निव्वळ त्यांच्या किमतीवर चर्चा व आश्‍चर्य व्यक्त करत बसण्यापेक्षा व हे कोणाला भेट द्यायला छान आहे असली वक्तव्य करण्यापेक्षा त्यातील परिणामकारक गुणधर्म व त्यातून निर्माण होणारी गुणवत्ता अभ्यासण्याचा प्रयत्न करावा व शक्य असेल तर त्यातील जाणकार व्यक्तींकडून ती माहीती मिळवण्याचा प्रयत्न करावा. इथे अजून एक गोष्ट सांगाविशी वाटते ती म्हणजे कलाकृतींना एकदम स्पर्श करणे त्यांच्या अती जवळ जाणे हे देखील टाळावे, अगदी एखादा अपघात जरी झाला नाही तरी आपल्या बोटांचे ठसे उमटण्याचा व पेंटिंग मधे वापरलेले पोत (Texture and thickness of color) व रंग लेपनातील तंत्र बिघडण्याची शक्यता असते. आपल्याला काही कोणी पेंटिंग विकत घ्यायची जबरदस्ती केलेली नाही अथवा निव्वळ आस्वादीक आनंद हा त्या पेंटिंगच्या किमतीवर कधीच अवलंबून नसतो. जसे सिनेमा पाहताना आपल्याला पूर्णपणे हे माहित असते कि त्यातल्या हिरो प्रमाणे प्रत्यक्षात आपण काहीच करू शकणार नाही तसेच मिडियानी काही जरी छापले तरी प्रत्यक्षात त्यांना किती मोबदला मिळतो व तो आकडा काहीही जरी असला तरी व त्या सिनेमाने किती गल्ला गोळा केला ह्यावर तो सिनेमा पाहून आपल्यावर होणारा परिणाम अवलंबून नसतो.

"तुम्ही मराठी लोक फार विचार करता व कला वगैरे सारख्या निरूपयोगी गोष्टि व तात्विक चर्चेमधे वेळ फुकट घालवता. आमच्या गुजराथी मधे एक म्हण आहे, एक गुजराथी व्यावसाइक एकदा मला सांगत होता. त्यातील आक्षेपार्ह्य शब्दामुळे ती म्हण इथे देता येत नाही पण त्याचा मतीतार्थ हा की जीवन जगून, गेला दिवस व गेलं आयुष्य जगून काय केले तर निव्वळ मूलभूत गरजा भागवून दिवसाचे शेवटी व आयुष्याचे शेवटी झोपी गेलो. आणि ह्या मूलभूत गरजा जास्तीत जास्त चांगल्या पूर्ण व्हायला जे करावे लागते तेव्हडेच आम्ही व्यापारी लोक करतो. आपल्या मराठीत तसेच भाव दर्शवणारी एक म्हण आहे "मनुष्या जन्मुनी केले काय? खाल्लो प्यालो ल्यालो अन काय?"




पृथ्वीतलावरील सर्वच जीव जंतू सतत आपल्या मूलभूत गरजा भागवण्याची धडपड करत असतात. मनुष्य प्राणी व इतर प्राणी ह्यांच्यातील फरक म्हणजे माणसाला स्वतःची, आपण माणूस असल्याची जाणीव असते. अध्यात्म शास्त्र सांगते की माणसाच्या शरिरात ह्या चित्रात दर्शवल्या प्रमाणे सात प्रमुख चक्रे असतात. कलाविषयक संदर्भात सांगायचे झाल्यास, मूलाधार चक्र जे सर्वात खाली असते तिथे कुंडलिनी शक्ती सुप्तावस्थेत असते. मुलाधार चक्र हे शरीर धारणा व शारीरीक गरजा ह्यांच्याशी निगडित असते व ही अज्ञानाची पातळी मानली जाते जसजशी ही कुंडलिनि शक्ती किंवा चैतन्य म्हणुयात वरच्या दिशेने सहस्त्रार चक्राकडे प्रवास करू लागते (ह्याला अनेक जन्मांचा काळ लागतो) तसतसे एक एक चक्रांच्या पातळीवरील वैशिष्ठये व गुणधर्म माणसात दिसू लागतात प्रथमतः मानवाला स्वतःचे व सभोवतालचे भान येऊ लागते. मानव ज्ञान व विज्ञान म्हणजे विशिष्ठ ज्ञान मिळवण्यासाठी प्रयत्न करू लागतो. जसे स्वाधिष्ठान चक्राची पातळी ही भौतीक जग, गणित, विज्ञान व तंत्रज्ञान त्याची समज, आवड व गती दर्शवते त्याच्या वर मणिपूरचक्रापासून साहित्यीक समज व ललित कला ह्यांचा प्रांन्त सुरू होतो व ह्या कलां मधील स्वारस्य व गती दर्शवते. मणिपूर चक्रापासून ते अनाहत चक्रा पर्यन्तचा प्रवास हा एक एक तरल कला जसे काव्य पेंटिंग संगीत इ. मधील स्वारस्य व गती दर्शवतो. अनहत चक्र जे हृदय स्थानाच्या जवळ आहे तिथपासून पुढे भक्ती व अध्यात्माचा प्रांत सुरूहोतो व विशुद्ध चक्रापासून पुढे संपूर्णपणे

आध्यात्मीक प्रांत व त्या मार्गावर वाटचाल सुरू होते व तोही अनेक जन्मांचा प्रवास आहे असे मानले जाते. आता आपल्याला जर का कलांचा पेंटिंग चा आस्वाद घ्यायचा आहे व अशा तरल कलांची आवड निर्माण झाली आहे, म्हणजे आपला चैतन्याचा प्रवास ऊर्ध्व दिशेला मणिपूर चक्रा पासून पुढे सुरू झाला असेल तर आपण किंमतींच्या व व्यवहारच्या भौतीक व गणितीय प्रांतातच अडकून पडावे का?

परत आपल्या भौतिक विश्वाकडे वळताना, एकदा माझ्या घरी एक व्यक्ती आली होती M. B. A. शिक्षित कुठल्याश्या अस्थापनेत वाणिज्य विभागत नोकरी करत होती. माझ्या घरी लावलेली पेंटिंग मी केली आहेत हे कळल्यावर एखादे एक्झिबिशन भरवले आहे का वगेरे विचारपूस करूलागल्याने बोलण्याच्या ओघात कळले की ती पूर्वी इव्हेन्ट मॅनेजर म्हणून कोणा एका आर्ट क्युरेटरकडे नोकरी करत होती व एक्झिबिशन्स भरवण्याच्या निमित्ताने आर्ट फिल्ड व आर्ट मार्केट, आर्टिस्ट ह्यांच्याशी व ह्या सगळया व्यवहाराशी ह्या व्यक्तीचा जवळून संबंध आला होता. “You know what an awful price these famous painters get? you should work towards an exhibition” ह्या बोलण्यातील टोन व वाक्याचा अर्थ वेगळा भासल्याने मी विचारले “I am surprised, do you mean awesome or you intend to say awful? Even after having worked in art field?”

Oh! Yes you corrected me, sorry, before joining art field I had this impression that paintings and artists get an awful price for their work, you know? फक्त काही चौकोन त्रिकोण काढलेल्या पेंटिंग ला इतकी किंमत का असा प्रश्ण पडायचा, पण जसजसा आर्ट फिल्ड व आर्ट मार्केट, आर्टिस्ट ह्यांच्याशी व संबंध आला व त्यातील टॅलेंट ओळखता येऊ लागल्यावर now I say that some artists and their work get awesome price! you know art in general deserve that price. कला समिक्षण व रसग्रहण शिकूनच आपण ऑफूल का ऑसम ही प्रतिक्रीया निश्चितपणे देऊ शकतो.

जेम्स व्हिसलर (Jems Vistler - July 11, 1834 – July 17, 1903) ह्या कलाकाराच्या मते “ An artist is not paid for his labour but for his vision” कलाकाराला मिळणारा मोबदला हा त्याच्या अंग मेहनतीचा मोबदला नसून त्याच्या कल्पना शक्ती  चा, कलादृष्टिचा मोबदला असतो.


ह्या कलाकाराच्या काही पेंटिंगज् मधून ही कला दृष्टी कशी व्यक्त होते ते पाहू. इथे ही सर्व पेंटिंगज् ह्या संदर्भातून दिली आहेत.

“This work is in the public domain in the United States, and those countries with a copyright term of life of the author plus 100 years or less”.



Harmony in Blue and Silver





Wrapping

Nocturn-sun



Arrangement in Grey and Black No.1 (1871) - Whistler's Mother




Symphony in White no 1 (The White Girl) - 1862



Arrangement in yellow and grey - 1858

# पेंटिंग विषयक उपयुक्त शब्दसुची

A

- Abstract — अमुर्त चित्रणशैली, विरूपीकरण
- Aesthetics — सौन्दर्यसंकल्पना, कलेबद्दल तत्वचिंतन
- Allegory — रूपकात्मक, संबोधात्मक अथवा बोधात्मक
- Art for Art's Sake — कले साठी कला, जी कलाकृती उपयोजीत कला नाही ती, व्यवहारीक तडजोड विरहीत कला .
- Atmospheric perspective — सभोवतालचे वातावरणिय बदल रंगातुन दर्शवून चित्रात खोली दर्शवणे

**B**

- Background — चित्रातील पार्श्र्वभुमी चित्रण, सभोवताल
- Balance — तौलनिक दृष्य जाणिव, समतोल
- Brushwork — कुंचल्याचा (Brush) वापर व त्याचे तंत्र

**C**

- Ceremonial Art — स्मृती प्रित्यर्थ निर्मीलेली कला
- Classic - Classical — अभिजितकला, विषिष्ठ वर्गाचे प्रतिनिधित्व करणारी
- Color — रंग
- Color Wheel — रंग चक्र
- Color Harmony — रंग सुसंवाद
- Color Temperature — रंगातुन व्यक्त होणारी उष्णता, उर्जा
- Commissioned Painting — एखाद्याच्या गरजे नुसार व अनुज्ञेनुसार केलेले पेंटिंग
- Complementary Colors — पुरक रंग संगती
- Composition — मांडणी, चित्रविषयातील आकारांची आभासी सत्यनिर्मिती सठी केलेली जुळणी
- Connoisseur — कलेचा आस्वादक, प्रगल्भ जाणकार
- Contrast — विरोधाभास, विरूद्ध तत्व
- Cool Colors — शित रंग, रंगातुन दृष्टिला जाणवणारी शितलता, थंडावा
- Critic — टिकाकार, कला समिक्षक

**D**

- Dead-Color — प्रभाव हिन रंग, आभा नसलेला रंग
- Depth — खोली, चित्रातील खोलीचा आभास, गडदपणा, सखोलता
- Detail — बारकावे
- Diagonal Line — तिरप्या रेषा
- Distorted — विरूपित, विरूपिकरण केलेला, जाणिवपूर्वक केलेला आकारातील बदल
- Drawing — चित्र, रेखाटन

**E**

- Elements of art — कलेतिल मुलतत्वे
- Emphasis — महत्वदिलेला ठशिव अथवा लक्षणिय
- Engraving & Etching — कोरलेल, कोरिव काम
- Expressive art — भावनिकता, भाऊकपणा दर्शवण्यास निर्मिलेली कला

**F**

- Figurative — अलंकारिक अथवा मानविय आकृती प्रतिमा दर्शवणारे
- Flat or Flatness — सपाट. खोली, उंचवटे, अथवा प्रतलांचा आभाव असलेले, खास करून छाया (सावली) आभाव असलेले
- Focal Point — दृष्य केंद्र बिंदू
- Foreground — पृष्ठभाग, नजरेत भरणारे उठावदार, महत्वपूर्ण आकार
- Form — स्वरूप, काया, वस्तुचे त्रिमितिय आकारमान
- Functional art — उपयुक्त, व्यवहारीक उपयोगात आणता येणारी कला

**G**

- Genre — जातकूळी, प्रकार, वर्ग
- Glaze/Glazing — झिलाई, पृष्ठाचा चमकदारपणा

**H**

- Highlight(s) — जास्त प्रकाशमान, प्रकाशझोत टाकलेला, महात्व वाढवलेला
- Hue — रंगछटा, रंगाची आभा

**I**

- Iconography — भाव वाचक, चिन्हात्मक

**L**

- Landscape — निसर्ग चित्रण, भुप्रदेश अथवा वास्तू बाहेरील सभोवताल दर्शवणारे, परिसर चित्रण
- Line — रेषा

**M**

- Masterpiece — एखादी अथवा एखाद्याची सर्वोत्कृष्ठ कलाकृती
- Medium & Binder — माध्यम, एकत्रित, एकजिव करणारे जिन्नस
- Modern — आधुनिक, सद्य स्थितीतील, हल्लीची, नविन
- Monochrome — एका रंगाच्या छटा वापरून रंगवलेले, एकरंगी

- Motif — एकसारख्या आकारांनी निर्माणकेलेला आकृती संच, जो सलगता अथवा एखादे महत्व पुर्ण तत्व दर्शवण्यास उपयुक्त ठरतो

**N**

- Narrative — संवाद प्रस्थापित करूशकणारे, संदेश देणारे, एखादी कथा, गोष्ट सांगण्याची कुवत असलेले

**O**

- Oil Paint — तैल रंग चित्रण
- Overlap — वरचढ, एकावर दुसरा आकार, एखादा आकार अथवा त्याचा भाग दुसऱ्या आकाराने झाकणे

**P**

- Palette — रंगमिश्रणासाठी वापरात येणारी थाळी, एखाद्या रंगचित्रात वापरलेल्या विशिष्ठ रंग संगतीला त्या पेंटिंगचे पॅलेट म्हणून संबोधलेजाते
- Panel Painting — तावदान, फळी वर केलेले चित्र
- Perspective — परिप्रेक्ष, त्रिमितिय चित्रण
- Plein Air — ऊघडयाजागेत केलेले अथवा जागेवर केलेले निसर्ग चित्रण, नैसर्गीक स्थळावर जाउन केलेले
- Portrait — व्यक्तीचित्रण
- Positive Shape — घनआकार, सुस्पष्ट, ठळक, महत्वपूर्ण आकार
- Primary Colors — मुलरंग
- Proportion — प्रमाण
- Principles of Design — चित्ररचनेची अथवा कलेतील मुलतत्वे

**R**

- Realism — सत्यवाद
- Renaissance — पुनरूथ्थान, पुनरूज्जीवन, १४, १५ व्या शतकातील कलाशैलीला दिलेनाव
- Rhythm — ताल

**S**

- Saturation — भरलेला, भरगच्च, संपृक्तता
- Secondary Colors — दुय्यम रंग, दोन मुलरंगांच्या समभाग मिश्रणाने तयार होणारा रंग
- School (of painting) — एखाद्या विशिष्ठ चित्र रंग शैलीत कामकरणारी व त्याची शिकावण देणारी संस्था अथवा कंपू
- Self-Portrait — स्वतःचे व्यक्तिचित्रण
- Shade(s) and Shadow(s) — छाया, सावली, काळोखी
- Sketch — रेखाकृती, रूपरेषा

- Space — मेकळीक, मोकळेपणा, अवकाश
- Still life — स्थिरचित्रण
- Stretcher — ज्यावर रंगचित्रण करायचे ते कापड, कॅनव्हास ताणून बसवलेली लाकडी चैकट
- Style — शैली, लकव, ढब
- Symmetry — सममिती, बांधेसूदपणा, प्रमाणबद्धता

**T**

- Tertiary Color — तृतिय क्रमाचे, एक मुळरंग व एक दुय्यमरंग मिसळून होणारा रंग
- Texture — पोत
- Three dimensional — त्रिमितिय, लांबी अथवा रूंदी, उंची व खोली दर्शवणारे
- Tone — छटा
- Tint — झाक, रंगछटा
- Transparent & Opaque Pain — पारदर्शक व अपारदर्शक रंग
- Two dimensional — द्विमितिय, लांबी अथवा रूंदी, व उंची दर्शवणारे, खोली चा आभाव असणारे

**U**

- Unity — एकसंघपणा

**V**

- Variety — विविधता, वैचित्र
- Vanishing Point — परिप्रेक्ष चित्रणातील विलन अथवा उगम बिंदू ज्याता चित्र एकजीव एकत्रीत होते अथवा जिथून उगम पावते असे वाटते तो बिंदू

**W**

- Warm Colors — उष्ण रंग रंगाची डोळयांना भासणारी नैसर्गीक उष्णता
- Wet-in-Wet — रंग लेपनातील एक रंगलेपन ओले असतानाच त्यात दुसरे रंग लेपन करण्याचे तंत्र

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. आपण पहाता ना? नवीन सुमारे तीस पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. सगळीच तुम्हाला हवी असतील तर संपर्कात रहा. VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या भावी योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान